ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १४ | पुणें, बुधवार तारीख ३१ डिसेंबर, १९५८ | अंक ४८

## विविध माहिती

**ब्रिटिश तज्ज्ञांचें आगमन** — डॉ. वेल्श नांवाचे ब्रिटिश अणुशास्त्रज्ञ ट्रॉंबे येथील अणुसंशोधन केंद्रांत काम करण्यासाठी आले आहेत. कोलंबो योजनेप्रमाणें तांत्रिक सहकार्य देण्याचा जो कार्यक्रम आहे, त्याला अनुसरून त्यांची दोन वर्षांसाठी नेमणूक झाली आहे. किरणोत्सारक जड घटकांच्या बाबतींतील संशोधनांत ते मदत करणार आहेत.

**चीनकडून स्वस्त दरानें तांदूळ** —आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंत तांदुळाची किंमत दर टनाला ३६ पौंड आहे. पण, चीननें हिंदला दर टनाला ३३ पौंड ह्या दरानें एक लाख टन तांदूळ पुरविण्याची तयारी दाखविली आहे. देशांत तांदुळाच्या किंमती स्थिर राखण्याचें भारत सरकारचें धोरण असल्यानें चीनच्या तयारीचा सरकार विचार करीत आहे.

**रेल्वेमार्गासाठीं विजेचा उपयोग** — कलकत्ता भागांतील रेल्वेमार्गाचें विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी १० कोटी रुपयांची सामुग्री लागणार आहे. जरूर ती सामुग्री पुरविण्यासाठी इटालिअन, ब्रिटिश व जपानी कंपन्यांकडे मागण्या नोंदविण्यांत आल्या आहेत. शक्य तेवढें हिंदी सामान वापरण्याचें कारखान्यांनीं कबूल केलें आहे.

**रेल्वेच्या वॅगन्स पडून आहेत** —नॉर्दर्न रेल्वेच्या फेराझपूर विभागांतील स्टेशनांवरून रेल्वेच्या ६०० वॅगन्स रिकाम्या पडून आहेत. ह्या भागांतील रस्त्यांवरून मालाची वाहतूक मोटारीनें अधिक प्रमाणांत होऊं लागल्यामुळें असें झालें आहे, असें रेल्वे अधिकारी सांगतात. सर्वच राज्यांत मोटारवाहतुकीचे अधिक परवाने देण्यांत आल्यामुळें ही परिस्थिति उद्भवल्याचें समजतें.

**भारतीय मालाची परदेशीं प्रसिद्धि** — 'इंडिअन एक्स्पोर्टर अँड इंपोर्टर' ह्या नियतकालिकाचे संपादक श्री. शहा ह्यांनीं असें आवाहन केलें आहे कीं, हिंदमधील कारखानदार, व्यापारी व परदेशांतील वकिलाती ह्यांनीं भारतीय मालाची परदेशीं प्रसिद्धि करण्याच्या कामीं सहकार्य करावें. असें सहकार्य झाल्यास निर्यात वाढण्यास मदत होईल, असें त्यांचें म्हणणें आहे.

**तेल-कंपनीशीं करार** —सुएझच्या कालव्यावर ब्रिटन व फ्रान्स ह्यांनीं दोन वर्षांपूर्वी जो हल्ला केला होता, त्यावेळीं इजिप्तच्या सरकारनें शेल ऑईल कंपनीची मालमत्ता आपल्या ताब्यांत घेतली होती. आतां सरकार व कंपनी ह्यांचा समझौता झाला आहे. ब्रिटन व इजिप्त ह्यांचे संबंध सुधारण्याची शक्यता आतां वाढली आहे.

**अमेरिकेचा नवा उपग्रह** — अमेरिकेनें 'अॅटलास' ह्या नांवाचा खंडांतर्गत प्रवास करणारा ४·५ टन वजनाचा प्रचंड उपग्रह पृथ्वीभोंवतील कक्षेंत सोडला आहे. रशिआनें अंतरिक्षांत फेकलेल्या व अद्याप भ्रमण करीत असलेल्या तिसऱ्या उपग्रहापेक्षा अमेरिकन उपग्रहाचें वजन जवळजवळ तिप्पट आहे.

**काश्मीरच्या प्रवासाचें आकर्षण** —काश्मीरच्या प्रवासाचें आकर्षण वाढविण्यासाठी काश्मीरच्या सरकारनें पुढील आर्थिक वर्षांत कांहीं योजना हातीं घेण्याचें ठरविलें आहे. ह्या कामासाठी १८ लाखांवर रक्कम मंजूर करण्यांत आली आहे. सुप्रसिद्ध दाल सरोवर अधिक आकर्षक करण्यांत येणार आहे.

**कुराणाचीं भाषांतरें** — हैद्राबादमधील एका सेवानिवृत्त न्यायाधिशांनीं कुराणाचीं १४ भाषेंत भाषांतरें करण्यासाठी एक संघटना स्थापन केली आहे. संघटनेमार्फत आतांपर्यंत संस्कृत, तामीळ, मलायालम, कानडी, मराठी, तेलगू आणि काश्मिरी भाषेंतील कुराणाचीं भाषांतरें पैदा करण्यांत आलीं आहेत.

**लुंगीच्या कापडाला बंदी** —भारतामधून येणाऱ्या लुंगीच्या कापडावर सिलोनच्या सरकारनें आयातबंदी घातली आहे. सिलोनमधील ह्या धंद्याला संरक्षण देण्यासाठीं हें धोरण स्वीकारण्यांत आलें आहे. भारताकडून सिलोनला दरसाल ७० तें ८० लाख रुपये किंमतीच्या लुंग्या पुरविल्या जातात. ह्या बंदीमुळें भारताच्या लुंगीच्या धंद्याला धक्का बसणार आहे.

**कागदाचा कारखाना** —आंध्र प्रदेशांतील निझामाबाद जिल्ह्यांत सार्वजनिक मालकीच्या विभागांत कागद तयार करण्याचा एक कारखाना काढण्याचा विचार करण्यांत येत आहे. पश्चिम जर्मनींतील एका कारखान्याकडून कागद कारखान्याची यंत्रसामुग्री घेण्यांत येणार आहे. जर्मन कारखान्याशीं करावयाच्या करारासंबंधीं वाटाघाटी चालू आहेत.

**लोकांचें सहकार्य नाहीं** – राज्यसभेंत समाजविकास योजना व राष्ट्रीय विस्तार योजना ह्यांच्यासंबंधीच्या ५ व्या मूल्यमापन अहवालावर दोन तास चर्चा झाली. त्या वेळीं विरोधी पक्षाच्या सभासदांनीं योजनांबाबत लोकांचें सहकार्य मिळविण्यांत येत नाहीं व खर्च निष्कारण केला जातो अशा तक्रारी केल्या.

**पन्हाळ्यावरील विश्रांतिस्थानें** —कोल्हापूरपासून १२ मैलांवर असलेल्या पन्हाळा किल्ल्यावर मुंबई सरकारनें प्रवाशांच्या सोयीसाठी दोन विश्रामगृहें बांधलीं आहेत. त्यासाठी ८०,००० रुपये खर्च आला. मध्यमवर्गीयांसाठी जीं ११ हवेचीं ठिकाणें सरकार तयार करणार आहे, त्यांपैकीं पन्हाळा हें एक आहे.

**कृत्रिम रबराच्या उत्पादनाचा कारखाना**—भारतांत कृत्रिम रबराच्या उत्पादनाचा कारखाना काढण्याची शक्यता अजमावण्यासाठी अमेरिकेच्या गुडइअर कॉर्पोरेशनचें एक प्रतिनिधिमंडळ आलें आहे. सरकार कृत्रिम रबराच्या उत्पादनाचा कारखाना काढण्याचा विचार करीत आहे. कारखान्यासाठी १५ कोटी रुपये भांडवल लागेल व तो दरसाल २,००,००० टन रबर निर्माण करूं शकेल.

**तेनसिंगच्या गिर्यारोहक कन्या**—प्रसिद्ध गिर्यारोहक श्री. तेनसिंग ह्यांच्या कन्या २६,००० फूट उंचीच्या शिखरावर आरोहण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या स्त्रियांच्या आंतरराष्ट्रीय तुकडींत सामील होणार आहेत. त्यांना गिर्यारोहणाचा चांगला अनुभव आहे. एव्हरेस्ट शिखरावरील मोहिमेंत त्यांनीं आपल्या पित्याबरोबर २०,००० फूट उंची गांठली होती.

**ब्रिटनची युगोस्लाव्हिआला मदत**—सोव्हिएट रशिआनें युगोस्लाव्हिआला द्यावयाच्या मदतीबाबत अनास्था दाखविली आहे. ह्या परिस्थितींत युगोस्लाव्हिआच्या सरकारला ३० लाख पौंड कर्ज देण्याची तयारी ब्रिटननें दाखविली आहे. रशिआनें युगोस्लाव्हिआला ३८ कोटी डॉलर्सची मदत देण्याची तयारी दाखविली होती. पण नंतर ती तहकूब केली.

**दिल्लीमधील भूमिगत पाण्याची पातळी**—दिल्लीच्या आसपासच्या विभागांत नव्या नव्या वसाहती स्थापन करण्यांत येत असल्यामुळें तेथील भूमिगत पाण्याचा निचरा होण्याची नैसर्गिक व्यवस्था बिघडली आहे. त्यामुळें भूमिगत पाण्याची पातळी वाढली असून इमारतींच्या पायांना धोका उत्पन्न होऊं लागला आहे. ही पातळी पृष्ठभागापासून १० फुटांपेक्षा कमी होतां कामा नये असें तज्ज्ञांचें मत आहे.

**जळगांवला शस्त्रक्रिया शिबिर**—फेब्रुआरी महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत मुंबई सरकार जळगांव येथें मोफत शस्त्रक्रिया शिबिर उघडणार आहे. १० दिवस चालणाऱ्या ह्या शिबिरांत गरिबांवर शस्त्रक्रिया करण्यांत येतील. मुंबईमधील नामांकित शस्त्रवैद्य सहकार्य करणार आहेत. ह्या कामीं होणाऱ्या ४०,००० रुपयांच्या खर्चापैकीं निम्मा खर्च राज्य सरकार सोसणार आहे.

**चंबळा नदीवरील धरण**—चंबळा नदीवर बांधण्यांत येत असलेल्या विविधोपयोगी धरणासाठी पुढील वर्षांत १६ कोटी रुपये मंजूर करण्यांत आले आहेत. एकूण रकमेपैकीं मध्यप्रदेश सरकार १० कोटी रुपये देणार असून बाकीचे ६ कोटी रुपये राजस्थानचें सरकार देणार आहे.



# अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले,
लोणचीं, पापड
ह्या वस्तूंनीं आपल्या
जेवणांत गोडी वाढते
व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —



किर्लोस्कर

**अिलेक्ट्रिक पंपिंग सेट**

यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकावू.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच
किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.

किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी, द. सातारा

# * दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड *

( शिड्यूल्ड बँक )

| हेड ऑफिस :—१० बुधवार पेठ, पुणें २<br>प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन ६५६३ ) | अध्यक्ष<br>श्री. ग. रा. साठे | मुंबई शाखा :—८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १<br>कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन २५३४०८ ) |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | ... ... | रु. ७,३०,४९० |
| खेळतें भांडवल | ... ... | रु. ५८,००,००० |

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १¾% टक्के ★ मुदत ठेवींवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल. बी. मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. ३१ डिसेंबर, १९५८



संस्थापक : प्रा. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## बिडाच्या लोखंडाची निर्यात होण्याची शक्यता

गेल्या तीन वर्षांच्या कालांत भारतानें लोखंड–पोलादाच्या धंद्याचा बळकट पाया घातला आहे. खाजगी मालकीच्या पोलादाच्या कारखान्यांचा विस्तार करण्यांत येत असून सरकारच्या मालकीचे तीन कारखानेहि उभारण्यांत येत आहेत. ह्या दूरदृष्टीचा परिणाम आतां लवकरच दिसूं लागेल. आतांपर्यंत भारताला भारी किंमत देऊन बिडाचें लोखंड आयात करावें लागत असे. परंतु लवकरच भारत स्वतःच लोखंडाची निर्यात करूं लागेल आणि अमूल्य असें परदेशीय चलन मिळवूं लागेल असें दिसतें. टाटा कंपनीच्या नव्या भट्ट्या चालू झाल्या आहेत आणि रूरकेला व भिलई येथील पोलादाच्या भट्ट्या कांहीं आठवड्यांतच उत्पादन करूं लागणार आहेत. ह्या सर्व घटना लक्षांत घेऊन सरकारनें लोखंडाची आयात कांहीं महिन्यांपूर्वीपासून बंद केली आहे. नव्या भट्ट्या चालू झाल्यामुळें लोखंडाचें जें जादा उत्पादन होईल तें बहुतेक पोलादाच्या निर्मितीसाठी वापरलें जाईल. नव्या भट्ट्यांतून लोखंडाचें उत्पादन करण्याची प्रक्रिया पूर्णांशानें चालू होण्यास फारसा अवधि लागत नसला तरी त्यापासून जरूर त्या प्रकारच्या पोलादाच्या वस्तू निर्माण करण्याची प्रक्रिया त्या मानानें अधिक काल लागणारी आहे. प्रत्येक पोलादाच्या कारखान्यांत लोखंडापासून पोलाद निर्माण करण्याच्या प्रक्रियेचा काळ निरनिराळा असला, तरी त्यांत फारसा फरक नाहीं. तथापि, एकंदरीनें लोखंडापासून पोलाद निर्माण करण्याचें काम १०० टक्के उत्पादनक्षमतेनें होण्यास वेळ लागण्याची शक्यता आहे.

त्यामुळें दरम्यानच्या सुमारें दोन वर्षांच्या काळांत भारतामधील पोलादाच्या कारखान्यांत स्वतःची गरज भागून कांहीं प्रमाणांत तरी बिडाचें लोखंड शिल्लक राहील, असा अंदाज करण्यांत आला आहे. सुमारें १० लाख टन लोखंड देशांतील गरजा भागून उरेल असें दिसत आहे. हें लोखंड निर्यात करतां येण्यासारखें आहे. लोखंडाच्या उत्पादनाची परिस्थिति अशा रीतीनें सुधारल्यामुळें देशांतील गरजा भागविण्यासाठी अधिकाधिक प्रमाणांत लोखंडाचें वांटप करणें शक्य होत आहे. सरकारनें लोखंडाच्या निर्यातीसाठी टेंडर्स मागविलीं असून प्रत्यक्ष निर्यात लवकरच होऊं लागेल असें समजतें. लोखंडाच्या नियंत्रणाची व वांटपाची सध्यांची जी पद्धत आहे तीप्रमाणें लोखंडाच्या व पोलादाच्या सर्व मागण्या आयर्न अँड स्टील कंट्रोलरकडे जातात व तेथून त्या निरनिराळ्या कारखान्यांच्याकडे पाठविल्या जातात. गिऱ्हाइकांच्या दृष्टीनें त्यांची मागणी कोठून भागविली जाते हा प्रश्न महत्त्वाचा नाहीं. कारण, त्यांना ठरविलेल्या किंमतीच द्याव्या लागतात. त्यामुळें ज्या कारखान्यांतून निर्यात करणें सर्वांत अधिक सोयीचें असतें तेथून तें निर्यात करणें सहज शक्य आहे. सध्यां भारताला दरसाल सुमारें ७०,००० टन अशुद्ध लोखंड स्वतःच्या गरजा भागविण्यासाठी लागतें. गेल्या मार्चमध्यें संपलेल्या वर्षांत ३,०८,००० टन लोखंड देशांत निर्माण करण्यांत आलें आणि १,५२,००० टन परदेशांतून आयात करण्यांत आलें. त्यासाठी ७ कोटी रुपये द्यावे लागले. १९५८ च्या पहिल्या सहामाहींत ३.५ कोटी रुपये किंमतीचें लोखंड आयात करावें लागलें.

---

## भारतामधील नैसर्गिक खनिज तेलाचे साठे

आसाम ऑइल कंपनीचे प्रमुख भूस्तरशास्त्रज्ञ मि. मेत्रे ह्यांनीं दिल्ली येथें भारतामधील नैसर्गिक वायूंच्या व तेलाच्या साठ्यासंबंधीं एक माहितीपूर्ण भाषण केलें. आसाम राज्याच्या वरच्या भागांत नसर्गिक वायूचे महत्त्वाचे साठे उघडकीस आले आहेत असें त्यांनीं जाहीर केलें. ह्या भागांतील तेल-खाणींपासून दरसाल २५ लाख टन अशुद्ध तेल मिळूं शकेल, व त्याशिवाय दररोज १०० घनफूट नैसर्गिक वायु उपलब्ध होण्याचीहि शक्यता आहे. ह्याचा अर्थ उष्णतेच्या परिमाणांत आणखी १० लाख टन तेल सांपडल्यासारखा आहे. ह्या सर्व वायूंचा उपयोग केला तर सध्यां तेलाच्या आयातीसाठी खर्च होणारे १० कोटी रुपयांचें परदेशीय चलन वाचेल. उपलब्ध होऊं शकणाऱ्या नैसर्गिक वायूंचा उपयोग करून घेणें हें राष्ट्रीय महत्त्वाचें असल्यानें त्यासंबंधींच्या योजनेला अग्रहक्क देण्यांत येईल अशी आशा व्यक्त करून ते पुढें म्हणाले कीं, तेलाच्या बाबतींत स्वयंपूर्णता प्राप्त करून घेण्यासाठी महनीय प्रयत्नांची आवश्यकता आहे. पुढील १० ते १५ वर्षांच्या काळांत ह्या कामासाठी ३,००० कोटी रुपये भांडवलाची अपेक्षा आहे. इतकी मोठी रक्कम सार्वजनिकरीत्या उभी करणें अव्यवहार्य वाटतें. भारत सरकारच्या तेल आणि नैसर्गिक वायू मंडळानें आपल्या परीनें प्रयत्नांची पराकाष्ठा केली तरीसुद्धां परदेशीय तेल कंपन्यांकडून अधिक भांडवलाची व तंत्रकौशल्याची जरूर लागेल.

भारतामधील पेट्रोलचा खप झपाट्यानें वाढत आहे. देशांतील सध्याचें उत्पादन बेताचेंच आहे. त्यामुळें तेलाच्या आयातीसाठी परदेशीय चलनाच्या साठ्यावर खूप ताण पडत आहे. सार्वजनिक मालकीच्या विभागांतील तेलशुद्धीच्या कारखान्यांतून उत्पादन होऊं लागेपर्यंत दरसाल १०० कोटी रुपयांचें परदेशीय चलन आयातीवर खर्च होत राहणार आहे. त्यानंतर सुद्धां परदेशीय चलनावरील ताण फारसा कमी होण्याची शक्यता नाहीं. कारण, १९७५–७६ च्या सुमारास तेलाचा खप दरसाल ५ कोटी टनांपर्यंत जाईल. नाहीं तर पेट्रोलच्या खपावर आळा तरी घातला पाहिजे. तेलाच्या बाबतींत स्वयंपूर्णता सिद्ध करण्यासाठी जो ३,००० कोटी, रुपयांचा खर्च लागणार आहे त्यापैकी १,५०० कोटी रुपये तेलाचा शोध, विहिरींची खोदाई आणि उत्पादन ह्यावर खर्च करावे लागतील. उरलेले १,५०० कोटी रुपये वाहतुकीच्या सोयी, तेलशुद्धि, वितरण आणि

बाजारपेठांची संघटना ह्या बाबींवर खर्च करावे लागतील. हे खर्चाचे आंकडे अवाढव्य आहेतच; पण त्याशिवाय तेलाच्या बाबतींतील उद्दिष्टें साधण्यासाठी उच्च प्रतीच्या तज्ज्ञांची व अनुभवी तंत्रज्ञांची आवश्यकता आहे आणि सध्यां तरी अशा प्रकारच्या लोकांची तेलाच्या धंद्यांत फारच वाण आहे. गेल्या सप्टेंबर महिन्यांत पंतप्रधान नेहरू ह्यांनीं असें जाहीर केलें कीं, रशिआखेरीज इतर कोणत्याहि देशाला आपलें औद्योगीकरण परदेशांच्या मदतीशिवाय साधता आलेले नाहीं. त्याचप्रमाणें त्यांनीं असेंहि सांगितलें कीं, तेलाच्या बाबतींत स्वयंपूर्ण होण्यासाठी परदेशांच्या मदतीची फार गरज आहे. अविकसित देशांतील तेलाच्या उत्पादनाचा विकास करण्यासाठी जगांतील मोठमोठ्या कंपन्या त्या त्या देशांच्या सरकारांना मदत देण्यास तयार आहेत. त्यांना योग्य व वाजवी सवलती दिल्या तर त्यांची मदत देशांना उपकारक ठरूं शकेल.

---

### ३१ मार्च रोजीं बँक ॲवॉर्डची मुदत संपल्यावर ?

बँक नोकरांचे प्रतिनिधी व बँकांचे प्रतिनिधी ह्यांची एकत्र सभा जानेवारींत बोलावण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. बँक ॲवॉर्डची मुदत ३१ मार्च, १९५९ रोजीं संपते. त्यानंतरहि सध्याच्याच नोकरीविषयक अटी चालू ठेवण्याचें सरकारनें मान्य केलें आहे. बँक नोकरांच्या प्रतिनिधींनीं सरकारच्या त्या खात्याचे मंत्री श्री. नंदा ह्यांची भेट घेतली व गेल्या पांच वर्षांत दिसून आलेल्या ॲवॉर्डमधील उणीवा त्यांना समजावून सांगितल्या. सरकारनें बोलाविलेल्या सभेंत मतभेद मिटले नाहींत, तर आर्बिट्रेशन किंवा ॲड्ज्युडिकेशनचा अवलंब करावा, असें बँक नोकरांच्या प्रतिनिधींचें म्हणणें आहे.

---

### दि साठे बिस्किट ॲंड चोकोलेट कं. लि.

वरील कंपनीनें १९५७-५८ ह्या वर्षीं एकूण ४०,४२,७२७ रु. ची विक्री केली. त्यापूर्वीच्या वर्षीं ३४,३७,१२६ रु. ची विक्री झाली होती. कंपनीला १६,२४,२०८ रु. ठोक नफा झाला. २,३५,६३३ रु. घसारा काढून व सर्व खर्च भागवून कंपनीस २,११,७९१ रु. नफा झाला. री. क्यु. प्रेफरन्स शेअर्स रिडेमशन फंडांत ५० हजार रुपये घालण्यांत आले. ऑर्डिनरी भागांस ६% डिव्हिडंडसाठी ५९,०१० रु. लागले. रि. प्रे. शेअर्सवरील ७% डिव्हिडंडसाठी ३१,५९० रु. चा विनिमय करण्यांत आला. कंपनीनें अहवालाचे वर्षीं जाहिरातींवर २,५३,४२५ रु. खर्च केले. डायरेक्टरांच्या फीप्रीत्यर्थ फक्त २,५५० रु. खर्ची पडले आहेत.

---

### बँक ऑफ बरोडाची सुवर्णमहोत्सवानिमित्त भागदारांना बोनस शेअर्सची देणगी

आपल्या बँकेच्या सुवर्णमहोत्सवाचे निमित्तानें बँक ऑफ बरोडाच्या डायरेक्टर बोर्डानें भागदारांना बोनस शेअर्स देण्याचें ठरविलें आहे. शेअर प्रीमिअमच्या पोटीं असलेल्या रकमेंतून २५ लक्ष रुपयांचें रूपांतर भांडवलांत करावें व त्याचे भाग भागदारांत वाटावे, अशी योजना आहे. प्रत्येकी १०० रुपयांचे पांच भाग धारण करणारास ५० रुपयांचा एक भाग, पूर्ण भरलेला, बोनस म्हणून मिळेल. त्याचप्रमाणें प्रत्येकी ५० रुपयांचे दहा भाग धारण करणारास ५० रुपयांचा एक भाग, पूर्ण भरलेला, बोनस शेअर म्हणून मिळेल.

## हिंदी कामगार आणि उत्पादनवाढ

कामगारांच्या आर्थिक परिस्थितींत सुधारणा होत गेल्याखेरीज कोणत्याच क्षेत्रांत उत्पादनवाढ होणें अशक्य आहे, असें मत मि. हेन्री पोलक ह्या अमेरिकन कामगार पुढाऱ्यानें दिल्ली येथें व्यक्त केलें. उत्पादनवाढीसाठी विनंत्या आणि प्रवचनें ह्यांचा हिंदी कामगारांवर कांहींहि परिणाम होणार नाहीं; उत्पादनवाढीच्या फायद्यांत तो सहभागी होणें आवश्यक आहे. तात्कालिक संकटांतून बाहेर पडण्यासाठी सबंध देशच आपलीं सुखें सोडून देत असतां तर गोष्ट वेगळी होती. पण सध्यांच्या परिस्थितींतील नफा आणि त्यांतील कामगारांचा वाटा ह्यामधील प्रचंड तफावतीचें समर्थन कसें करतां येणें शक्य आहे, असा मि. पोलक ह्यांनीं प्रश्न केला. आर्थिक भरभराट चिरस्थायी व्हावयाची असेल, तर तिच्यांत कामगार सहभागी व्हायलाच हवा. राजस्थानांतील जिप्समच्या खाणींचें त्यांनीं उदाहरण दिलें. तेथील कामगारांना दररोज कसाबसा एक रुपया मजुरी मिळते, पण नफ्याचें प्रमाण ११०% आहे. अशी परिस्थिति किती काळ टिकणार ? किती काळ असें उत्पादन चालू राहणार ? लोकशाहीमध्यें नफ्याची न्याय्य वाटणी अत्यावश्यक आहे. हिंदी कामगाराच्या शारीरिक शक्तीच्या मर्यादाहि जाणल्या पाहिजेत. अपुऱ्या आहारामुळें उत्पादनक्षमता कमी होते आणि त्याला मूळ कारण अपुरें वेतन हेंच असतें. कामगारांच्या मागण्यांना भरमसाट लेखून केवळ हिंदी आर्थिक प्रगतीचा प्रश्न सुटणार नाहीं.

---

### लोकसंख्येची वाढ : आर्थिक प्रगतीमधील अडथळा

"आशिआचें पुढारीपण कोणत्या देशाला मिळेल ? जो देश लोकसंख्या आटोक्यांत ठेवण्यांत यशस्वी होईल, त्यालाच !" अमेरिकेंत नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या, पॉप्युलेशन रेफरन्स ब्यूरोच्या बुलेटिनमध्यें भारताच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करतांना, वरील प्रकारें निष्कर्ष काढण्यांत आला आहे. भारतामधील जननाचें प्रमाण आतांप्रमाणेंच राहिलें आणि मृत्यूचें प्रमाण उतरत गेलें, तर १९८६ मध्यें भारताची लोकसंख्या दुप्पट झालेली आढळेल. पंचवार्षिक योजनांद्वारें रहाणीचें मान सुधारण्याची आशा त्यामुळें फोल ठरेल. दारिद्र्य आणि दैन्यावस्था ह्यांच्या तावडींत सर्व लोक सांपडतील. पण कांहीं अगम्य कारणामुळें जननाचें प्रमाण तात्काळ घटलें आणि १९८१ च्या सुमारास तें निम्में झालें, तरच आर्थिक उद्धाराची आशा फलद्रूप होण्यास वाव मिळेल. ४० कोटींची ६० कोटी लोकसंख्या झाली, तरी ती पुष्कळच बेतांत वाढली, असें म्हणावें लागेल !

---

### परकीय नोकरांत ८७·२% इंग्रज

भारतांतील परकीय कंपन्यांतील वरिष्ठ श्रेणीमधील ५,६५२ नोकरांपैकीं ४,९२७ (८७·२%) ब्रिटिश व २०० अमेरिकन (३·५%) आहेत. इटालियन, जर्मन, ऑस्ट्रेलियन, चिनी, नॉर्वेजियन व सिलोनी यांच्या संख्येत किंचित वाढ झाली आहे तर ब्रिटिश, अमेरिकन, स्विस, ग्रीक, डॅनिश, फ्रेंच, न्यूझीलंडर, डच, स्विडिश, ऑस्ट्रियन, झेक, जपानी व पाकिस्तानी यांची संख्या कमी झाली आहे.

---

## रोकड आणि चेक ह्यांची जागा घेणारें
## क्रेडिट कार्ड

सोन्या-चांदीच्या नाण्यांची जागा कागदी नोटांनीं घेतली. ह्या नोटा हाताळणें लोकांना गैरसोईचें वाटूं लागलें आणि त्यांची जागा चेकनें घेतली. परंतु आतां चेक लिहिण्याचीहि लोकांना दगदग वाटूं लागली आहे. अमेरिकेंत 'क्रेडिट कार्ड' म्हणजे पत-निदर्शक पत्रिका बाळगणारे लक्षावधि लोक ह्या पासपोर्टच्या आधारावर उधारीनें खरेदी करीत आहेत. महिनाभर केलेल्या शेंकडों खरेद्यांची रक्कम महिनाअखेर एकदांच देण्याची सोय त्यामुळें उपलब्ध झाली आहे.

डायनर्स क्लब ह्या संघटनेनें प्रथम सुमारें १७,००० हॉटेल्स, नृत्यगृहें, दुकानें, इत्यादींची साखळी तयार करून ७,००,००० सभासद नोंदविले. प्रत्येक सभासदानें दरसाल आपल्या क्रेडिट कार्डासाठी ५ डॉलर द्यावयाचे. सभासदानें यादींतील कोठल्याहि ठिकाणीं उधारीनें रहावें, खावें, खरेदी कराव्या; त्याला कोणीहि रक्कम मागणार नाहीं. त्यानें कार्ड दाखविलें, कीं पुरें. महिनाअखेर त्याच्याकडील एकूण येण्याचा हिशेब डायनर्स क्लबकडे तयार होईल त्याप्रमाणें त्यानें पैसे भरले, म्हणजे झालें.

अमेरिकन एक्सप्रेस कंपनीनें ह्या क्षेत्रांत आतां प्रवेश केला आहे. ह्या कंपनीनें प्रत्येक कार्डवाल्याकडून वार्षिक ६ डॉलर घेण्याचें ठरविलें आहे. कंपनीच्या ट्रॅव्हलर्स चेक्सना आंतरराष्ट्रीय मान्यता मिळालेली आहे, तशीच तिच्या क्रेडिट कार्डांनाहि मिळेल. ह्या क्रेडिट कार्डाच्या द्वारा सभासदांच्या सर्व गरजा भागविल्या जातील, अशी कंपनीची अपेक्षा आहे.

क्रेडिट कार्डें देणाऱ्या संघटना आपल्या सभासदांच्या अधिकाधिक सोई पाहूं लागल्या आहेत. मोटारदुरुस्ती, दुकानांतील खरेद्या, फुलें, बसचें भाडें, तारेचा चार्ज, हीं सर्व क्रेडिट कार्डाच्या कक्षेंत आणण्यांत आलीं आहेत. त्याचबरोबर, अशा संघटनांचीं विलीनीकरणेंहि होऊं लागलीं आहेत. गॉरमेट गेस्ट क्लब (४०,००० सभासद) अमेरिकन एक्सप्रेसमध्यें विलीन झाला आहे, तर एस्कायर क्लब (१,००,००० सभासद) डायनर्स क्लबाचा भाग बनला आहे. ४,५०० हॉटेल्स आपल्या यादीवर असणाऱ्या युनिव्हर्सल ट्रॅव्हल कार्डला अमेरिकन एक्सप्रेसनें विकत घेतलें आहे.

क्रेडिट कार्डच्या वाढत्या प्रसारामुळें हॉटेल्स, रेस्टॉरें, इत्यादी पुढें एक नवाच प्रश्न उपस्थित झाला आहे. त्यांना गिऱ्हाइकांची जरूरी आहे, पण त्यासाठी कमिशन देण्यास त्यांची नाखुषी आहे. क्रेडिट कार्डच्या संघटना आपल्या ग्राहकांच्या वतीनें जीं बिलें भरतात, त्यावर ७% कमिशन कापतात. अमेरिकन एक्सप्रेसचें कमिशन ३% ते १०%, कामाच्या स्वरूपाप्रमाणें, असतें. अमेरिकन एक्सप्रेसनें युनिव्हर्सल ट्रॅव्हल कार्डवर ताबा मिळविला, तेव्हां ट्रॅव्हलकार्डच्या पटावरील हॉटेल्सकडून कमिशन घेतलें जाणार नाहीं असें अमेरिकन एक्सप्रेसनें कबूल केलें. पण ही सवलत इतर हॉटेल्सना दिली जात नाहीं. हिल्टन हॉटेल्स कॉर्पोरेशन व शेरेटन हॉटेल्स कॉर्पोरेशन ह्या प्रमुख हॉटेल कंपन्या आपल्या गिऱ्हाइकांशीं प्रत्यक्ष संबंध सुटूं नये ह्यासाठी विशेष प्रयत्न करीत असून क्रेडिट कार्ड कंपन्यांशीं ओढून घरीत आहेत. क्रेडिट कार्ड कंपन्यांच्या साम्राज्यांत सामील झालों, कीं स्वातंत्र्य नष्ट होईल असें त्यांना वाटतें.

क्रेडिट कार्डाची कल्पना मोठी आकर्षक आहे. हें कार्ड धारण करणाऱ्या अमेरिकन नागरिकाचें सर्वत्र स्वागत होतें, त्याला हवें

अमेरिकन एक्सप्रेस कंपनी

**क्रेडिट कार्ड**

३० एप्रिल, १९५९ ला मुदत संपते.

| खातें नंबर | ०१२ | ३४५ | ६७८ | ९ |
|---|---|---|---|---|

**जॉन जे. स्मिथ**

वेल्स फार्गो आणि कंपनी

१२३, मेन स्ट्रीट,

सेंटरव्हिल (यु. एस. ए.)

*JOHN J. SMITH*

अधिकृत सही – कार्ड धारण करणारासाठीच फक्त

(मागील बाजू पहा)

तें मिळतें, चेकवर साधी सही करण्याचाहि त्याला त्रास घ्यावा लागत नाहीं. महिनाअखेर हिशेब पुरा करतां येतो. ह्या क्रेडिट कार्डामार्गे त्याची मोठी पत उभी असते, हें मात्र विसरून चालणार नाहीं. वाटेल त्याला क्रेडिट कार्ड दिलें जाणार नाहीं, हें उघड आहे. उधारीचा व्यवहार केला, तरी दर महिन्याला त्याचा हिशेब पुरा करावा लागतो, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. पुरेशी प्राप्ति असणारे व मोठ्या खरेद्या करणारे सधन नागरिक लक्षावधि असतील आणि आर्थिक व्यवहार सुसंघटित चालतील, अशाच देशांत क्रेडिट कार्डाची सोय शक्य आहे. उधारीचा व्यवहार, म्हणजे अधिक मोठा आणि खात्रीचा व्यवहार असेल, तरच क्रेडिट कार्डाला दुकानदार मानतील. ऐपत नाहीं म्हणून उधार घेणारांच्या समाजांत क्रेडिट कार्डांना जागाच नाहीं; पत-पत्रिकांचें नापत-पत्रिकेंत रूपांतर व्हावयाचें!

## पत्राला किती किंमत पडते?

टाइपरायटर्सच्या एका कारखानदारानें लंडनमधील कचेऱ्यांतून पाठविण्यांत येणाऱ्या पत्रांना किती किंमत पडते, हें काढण्यासाठी वीस टायपिस्टांची छाननी केली. चांगल्या कंपनीच्या कचेरींत प्रत्येक पत्राला ९ पेन्स ते १ शि. ५ पेन्स एवढी किंमत पडते, असें आढळून आलें. जास्त तपशीलाच्या इनव्हॉइसला प्रत्येकी ५ शिलिंग व विमा पॉलिसीला १२ शि. १ पेन्स पडतात. मामुली टायपिंगचाच विचार करण्यांत आला. टायपिस्टला प्रथम शॉर्टहँडमध्यें पत्र लिहून घ्यावें लागत नाहीं, असें गृहीत धरण्यांत आलें. टायपिस्टला देण्यांत येणारा पगार, बोनस, पेन्शन, भत्ता, इत्यादींची रक्कम टायपिंगवरील खर्चाच्या प्रत्येक १ पौंडांत १५ शिलिंगपर्यंत जाते. म्हणजे, ७५% खर्च त्यावरच होतो. स्टेशनरीवरील खर्च प्रत्येक पौंडांत ३½ शिलिंग भरतो. कित्येक टायपिस्ट दरसाल १७ पौंड किंमतीच्या टाइपरायटर रिबन्स वापरतात, पण त्याचा खुलासा केलेला नाहीं! रोजच्या कामाच्या वेळापैकी किती वेळ प्रत्यक्ष टाइपरायटर बडविण्यांत जातो, ह्याची छाननी केली तेव्हां ती वेळ कांहींचे बाबतींत फक्त १८% भरला. कांहीं टायपिस्टांच्या बाबतींत तें प्रमाण ६६% पर्यंत गेलें. पण, ४० ते ५०% अशी सरासरी निघाली. वरिष्ठांच्या सूचना मिळविण्यांत, गिचमीड हस्ताक्षर वाचण्यांत, कागद शोधण्यांत, चुका खोडण्यांत, कमी वेळ वाया गेला तर कार्यक्षमता वाढेल. कारखान्याच्या आंत ज्या कार्यक्षमतेनें काम चालतें, ती कार्यक्षमता कचेऱ्यांतून आढळत नाहीं. डिक्टेटिंग मशिन्स व इलेक्ट्रिक टाइपरायटर्स ह्यांचा उपयोग त्यांना एकसारखें कामास लावलें, तरच होणार. प्रत्येक कचेरीनें ह्याबाबतींत छाननी करून काटकसर करण्यास भरपूर वाव आहे.

# साठे बिस्किट व चॉकोलेट कंपनी लि.

( पुरेसा कच्चा माल मिळण्याची अडचण, निर्यातीस सरकारचें सक्रीय प्रोत्साहन नाहीं, चालू उद्योगधंद्यांना थोड्या परदेशी चलनांतून भरपूर परदेशी चलन मिळवतां येईल, भारतांतील परदेशी-संबंधित कंपन्यांची अनिष्ट स्पर्धा, हिंदी कंपन्यांची शिकस्त, इत्यादि प्रश्नांची चर्चा )

पुरेसा कच्चा माल मिळण्याची अडचण अद्याप चालू आहेच. उत्पादनवाढीमुळें धंद्यांना लागणाऱ्या जादा आवश्यक परदेशी कच्च्या मालासाठी लागणारें परदेशी चलन त्या त्या धंद्यानें जरूर तर नुकसान सोसूनहि आपला माल निर्यात करून मिळविण्याचा प्रयत्न करावा अशी सूचना भारत सरकारच्या नामदार उद्योगमंत्र्यांनीं नोव्हेंबर, १९५७ मध्यें केली होती. या सूचनेस अनुसरून जास्तींत जास्त माल निर्यात करण्याचा कसोशीनें प्रयत्न चालू आहे. जून, १९५८ अखेर श्री. ग. रा. साठे हे आपल्या मालास परदेशी बाजारपेठ मिळविण्याचा प्रयत्न करण्यासाठी सीलोन, एडन, इंग्लंड, युरोपांतील कांहीं देश, ईजिप्त व ब्रिटिश पूर्व आफ्रिकेच्या दौऱ्यावर गेले होते व त्यांचा हा दौरा कल्पनेपेक्षाहि यशस्वी झाला. वैयक्तिक भेटीमुळें व वाटाघाटीनें इंग्लंडमध्यें कोको-बटरसाठीं व सिलोन व एडन येथें बिस्किटांसाठी बाजारपेठ मिळविणें शक्य झालें. ब्रिटिश पूर्व-आफ्रिकेच्या चारीहि राज्यांत आपल्या मालाचें वितरण करण्याची व्यवस्थाहि आतां केली आहे. कुवेतहूनहि नुकतीच मागणी आलेली आहे. तथापि सरकारकडून अद्याप निर्यातीच्या बाबतींत आवश्यक तें सक्रिय प्रोत्साहन मिळत नाहीं, हें सांगण्यास खेद वाटतो. सध्यां अशी परिस्थिति आहे कीं, उत्पादनवाढीस लागणारा परदेशी कच्चा माल व पॅकिंगसाठी लागणारा कागद व डबे वगैरे माल खुल्या ( ? ) बाजारांत नहमींच्या किंमतीच्या दुपटीहूनहिं जास्त किंमतीस विकत घ्यावा लागत आहे व त्यामुळें उत्पादन-खर्च वाढत आहे. मला हें मान्य आहे कीं, सध्यांच्या बिकट परिस्थितींत प्रत्येक देशप्रेमी कारखानदारानें फायदा किंवा तोटा यांकडे लक्ष न देतां झीज सोसूनहि जास्तींत जास्त माल निर्यात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पण त्याचबरोबर सरकारकडूनहि जें प्रोत्साहन मिळावयास पाहिजे, तें अधिकाऱ्यांच्या बेफिकिरी-मुळें कदाचित् नसेल पण वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या लाल फितीच्या धोरणामुळें मिळत नाहीं, ही वस्तुस्थिति आहे.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेनुसार अपेक्षित बेकारी कमी न होतां उलट ती वाढतच असल्याचा प्रवाद वरचेवर कानीं येतो. याचें मुख्य कारण असें कीं, कच्च्या मालाच्या अभावीं चालू उद्योगधंद्यांना उत्पादनवाढ तर दूरच राहो, पण नेहमींइतकेंहि उत्पादन करणें कठीण झालें आहे. वास्तविक पाहतां ज्यांच्या यंत्रखरेदीसाठी अधिकाधिक परदेशी चलन लागेल असे नवीन मोठमोठे उद्योगधंदे सुरू करण्यापेक्षां सध्यां चालू असलेल्या ज्या धंद्यांना कमींतकमी परदेशी कच्चा माल लागतो त्यांच्या उत्पादनक्षमतेस आवश्यक इतकें परदेशी चलन सरकारनें उपलब्ध करून दिल्यास चालू धंद्यांचें उत्पादन वाढून अधिक लोकांस कामधंदा मिळेल. एवढेंच नव्हें, तर उत्पादन खर्च कमी होऊन जादा झालेलें उत्पादन सध्यांपेक्षा कमी नुकसानींत निर्यात करतां येईल. बिस्किटधंदा यांपैकीच एक असून या धंद्यासाठी तयार मालाच्या किंमतीच्या १० टक्क्यांपेक्षाहि कमी कच्चा माल आयात करावा लागतो. या व अशा प्रकारच्या धंद्यांस लागणाऱ्या थोडक्याशा परदेशी कच्च्या मालासाठीं जर पुरेसें परदेशी चलन उपलब्ध करून दिलें तर जास्त जास्त माल निर्यात करून कदाचित् थोड्याशा अवधींत या धंद्यांस लागणाऱ्या सर्व कच्च्या मालासाठी लागणारें संपूर्ण परदेशी चलनहि मिळण्याची शक्यता निर्माण होऊं शकेल. बिस्किटें हीं नेहमींच्या कापड, तागमाल, चहा, वगैरे निर्यातीच्या व्यतिरिक्त नवीन वस्तु असल्यानें या निर्यातीपासून मिळविलेले सर्व परदेशी चलन या धंद्याच्या उपयोगासाठी उपलब्ध करून दिलें तरी कांहींच बिघडणार नाहीं.

चॉकोलेटच्या धंद्याची गोष्ट जरा वेगळी आहे. यासाठी जवळ जवळ ५० टक्के कच्चा माल आयात करावा लागतो. पण ही परिस्थिति फक्त भारतापुरतीच नसून चॉकोलेट उत्पादन करणाऱ्या सर्व देशांतहि हीच परिस्थिति आहे. या धंद्यांत कव्हरिंग चॉकोलेट, कोको व कोको-बटर हा अर्धपक्का माल तयार होतो. यांचा उपयोग कच्चा माल म्हणून मिठाईवाले, औषधींचे कारखानदार व आजाऱ्यांसाठी खाद्यपेय पदार्थ तयार करणाऱ्या धंद्यांसाठी करण्यांत येतो. या कारणांमुळें या धंद्यांचे विशेषत: नुकतेच स्थिरावत असलेले औषधींचे कारखाने व आजाऱ्यांसाठी खाद्यपेय पदार्थ तयार करणारे कारखाने, यांचें भवितव्य कोको-चॉकोलेट धंद्याच्या अस्तित्वावर अवलंबून आहे. या सर्व कारणांमुळें कोको-चॉकोलेट धंद्यांकडे निराळ्या दृष्टिकोनांतून पाहणें जरूर आहे. या धंद्यांत लागणारा मुख्य कच्चा माल कोको बिया. यांचें उत्पादन आपल्या देशांत होत नाहीं. भारतांत त्यांची लागवड करण्याचे प्रयोग चालू आहेत, पण हे प्रयोग यशस्वी झाले तरी त्यांपासून पुरेसें पीक निघण्यास अद्याप कित्येक वर्षें लागतील. तोंपर्यंत तरी हा धंदा व त्यावर अवलंबून असलेले इतर धंदे चालू ठेवण्यासाठी पुरेसे कोको बीं आयात करण्यास सरकारनें परवानगी दिली पाहिजे; पण दुर्दैवानें आम्हांस देण्यांत येणाऱ्या कोको-बियांच्या परवान्यांमध्यें फारच घट करण्यांत आली असल्यानें आम्हांस नाइलाजानें आमचें उत्पादन कमी करावें लागत आहे.

या धंद्यास दुसरी एक अडचण आहे, ती म्हणजे आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या दुसऱ्या एका कंपनीस मुंबईस कारखाना काढावयास दिलेली परवानगी. सध्यांचें सरकारी धोरण, कदाचित् हेतुपुर:सर नसेलहि, पण दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, त्यामुळें बिस्किट, कोको, चॉकोलेट, साबण, शाई व सौंदर्यप्रसाधनें इत्यादि तयार करणाऱ्या परदेशी कारखानदारांना मात्र कोणत्या ना कोणत्या-प्रकारें जादा सवलती मिळत आहेत. कोको चॉकोलेट धंद्याचें उदाहरण द्यावयाचें झाल्यास चॉकोलेटच्या या परदेशी कारखान्यास त्यांच्या जवळचे शिलकी कोको बटर इंग्लंडमधील त्यांच्या मुख्य कंपनीस विनासायास विकतां येऊन त्यापासून

दातांच्या स्वच्छतेसाठी
माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर

मिळालेल्या परदेशी चलनांतून निर्यातवाढ धोरणानुसार त्यांना जादा कोको-बीं विकत घेतां आलें. उलटपक्षीं आम्हांस कोको-बटर निर्यातीसाठीं गिऱ्हाईक मिळविण्यास व त्याच्या प्रतीबद्दल खात्री करून देण्यास बराच त्रास पडला. हीच गोष्ट कोको-बीं खरेदीसंबंधीं आहे. यासंबंधीं टॅरिफ कमिशनच्या अहवालांतील पुढें उद्‌धृत केलेला भाग उल्लेखनीय आहे.

"अफाट साधानसामग्री व जागतिक यंत्रणा असलेल्या एका मोठ्या परदेशी संबंधित कंपनीच्या द्वारां मे. कॅडबरी फ्राय (इंडिया) ही कंपनी कोको बीं खरेदी करीत असल्यानें तिला तें स्वस्त दरांत मिळवितां येतें."

वरील उद्‌गार सुस्पष्ट असून देशी कंपनीचें यासंबंधी नुकसान न होऊं देण्याची खबरदारी सरकारनें घेतली पाहिजे. यावर उपाय म्हणजे मे. कॅडबरी फ्राय या कंपनीस त्यांच्या इंग्लंड-मधील कंपनीकडून खरेदी न करतां नेहमींच्या बाजारांतून कोको-बीं खरेदी करण्यास सरकारनें भाग पाडलें पाहिजे. कोको बीं हें मोसमी पीक असून त्याच्या किंमतींत वेळोवेळीं प्रसिद्ध होणाऱ्या पिकाच्या अंदाजावरून मोठ्या प्रमाणांत चढउतार होतो. या कारणासाठी आम्ही कोको-बींच्या आयातीच्या परवान्याची मुदत एक वर्षाची असावी, व बाजारभाव पाहून योग्य वेळीं किफायतशीर रीतीनें कोको-बीं खरेदी करतां यावें म्हणून आमच्या हातांत नेहमीं एक चालू परवाना असावा अशी विनंती सरकारकडे करीत आलों आहों. त्याप्रमाणें मध्यंतरीं एकदोन वेळां परवाने मिळालेहि. पण आतां पुन्हा मर्यादित मालाचा व तोहि फक्त सहामाही परवाना देण्यांत येऊं लागला आहे. आमची विनंती मान्य झाली तर आम्हांस कमी दरांत खरेदी करण्याची शक्यता निर्माण होऊन त्या प्रमाणांत परदेशी चलनाची बचत होणेंहि शक्य आहे.

(अध्यक्ष, श्री. प. ब. गणपुले, ह्यांचें ९ व्या वार्षिक सभेचें वेळीं भाषण.)

### जपानमधील जमीनधारणा पद्धतींत सुधारणा

दिल्लीमधील जपानचे वकील डॉ. नासू ह्यांनीं इंडिअन कौन्सिल फॉर वर्ल्ड अफेअर्स ह्या संस्थेपुढें "जपानमधील जमीनसुधारणा" ह्या विषयावर माहितीपूर्ण व्याख्यान दिलें. डॉ.नासू म्हणाले कीं जपानमधील जमीनधारणा पद्धतींत सुधारणा करण्यास १९४६ सालीं प्रारंभ झाला. जपानच्या समाजावर केलेली ती एक प्रकारची शस्त्रक्रियाच होती आणि तीमुळें जपानी समाज अधिक बलवान झाला. अर्थात्‌ ही शस्त्रक्रिया वेदनामय होती. ही सुधारणा यशस्वी होण्याच्या कामीं एकंदरीनें जपानी लोकांचा शांतपणाच उपयोगी पडला. जपानमधील त्यावेळचें सरकार आणि अमेरिकेचें जपानमधील लष्कर ह्यांनीं जमीनधारणा सुधारणेची चळवळ घाईगर्दीनें सुरू केली. ह्या चळवळीचा मुख्य उद्देश कम्युनिझमच्या वाढत्या लाटेला थोपवून धरण्याचा होता. पण त्याचबरोबर ग्रामीण लोकशाहीची स्थापना करणें, सामाजिक न्यायाला प्रतिष्ठा देणें, आणि उत्पादन वाढविणें हेंहि उद्देश पुढें ठेवण्यांत आले होते. सरकारनें ३० लाख एकरांपेक्षा थोडी अधिक पडीक जमीन आपल्या ताब्यांत घेतली व त्यापैकी १० लाख एकर जमीन शेतकऱ्यांत वाटून दिली. जपानमधील एकूण जमिनींपैकीं जवळ जवळ ३८ टक्के जमीन सरकारनें कमी दरानें विकत घेतली व ती स्वतः जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांना वाटून दिली. जमीनधारणा बदलण्याच्या ह्या उपक्रमांत ह्या ना त्या नात्यानें २५ लाख लोकांचा संबंध आला. जपानमधील जमीनमालकांच्या एकूण संख्येपैकीं ४४ टक्के मालक सुधारणेशीं संबंधित असे झाले. बहुतेक जमीन गैरहजर जमीनमालकांपासून घेण्यांत आली. असें करण्यांत अपंगांना व विधवांना अन्याय झाला व पुष्कळांनीं आत्महत्या केल्या, हें खरें आहे.


स्थापना १९३६

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा

[शेड्यूल्ड बँक]

हेड ऑफिस-पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा शहर.
शाखा–मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, बार्शी, नासिक, लोणंद, कोल्हापूर, हलकर्णी, इचलकरंजी व फलटण.
लौकरच मुंबई दादर भागांत शाखा सुरू करणेंत येत आहे.

ता. ३०-६-५८ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | ४,१५,००० |
| ठेवी | रु. | १,३२,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,५३,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर:

| १ वर्ष ते दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|
| रु. ३·०० | रु. ३·२५ | रु. ३·५० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४·००

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २·०० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | १·५० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०·५० |

सेव्हिंग्ज बँक व से. डिपॉझिट खात्यावर नवीन आकर्षक नियम तयार केले असून व्याजाचे दरांतहि वाढ केली आहे. त्याबद्दलची सविस्तर माहिती आमचे कोणत्याहि शाखेंत मिळूं शकेल.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



सुरक्षित गुंतवणूक तथापि भरपूर मोबदला

## दि बेळगांव बँक लिमिटेड

(शेड्यूल्ड बँक)
मुख्य कचेरी: रविवार पेठ, बेळगांव

**मुंबई व म्हैसूर राज्यांत एकूण २५ शाखा**

आमच्या ठेवीदारांसहि योग्य मोबदला मिळावा म्हणून आम्ही ठेवींवरील व्याजाचे दर खालीलप्रमाणें वाढविले आहेत.

★ द. द. शें. ४ टक्के व्याजाच्या त्रैवार्षिक कॅशसर्टिफिकेटसची नवीन योजना—

★ मुदत ठेवी—

| | | | |
|---|---|---|---|
| ६ महिने | द. द. शें. | ३ | टक्के |
| १ वर्ष | ,, | ३। | ,, |
| २ वर्षें | ,, | ३॥ | ,, |
| ३ वर्षें | ,, | ३॥। | ,, |
| ४ वर्षें | ,, | ४ | ,, |

★ सेव्हिंग्ज खातें द. द. शें. २ टक्के
होम सेव्हिंग्ज खातें ,, २॥ ,,

★ आकर्षक मोबदल्याची मासिक समान हप्त्यांची क्युम्युलेटिव्ह डिपॉझिट खातीं १, २, ३ व ४ वर्षांचे मुदतीनें स्वीकारलीं जातात.

—बँकेचें स्थैर्य व प्रगति दर्शविणारे आंकडे—

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. सहा लाख |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | ,, सवातीन लाख |
| एकूण ठेवी | ,, एक कोटी, सदतीस लाख |

विशेष माहितीसाठीं आमच्या कोणत्याहि शाखेंत चौकशी करा.

गो. वि. सराफ, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.
एच्. एस्. कुलकर्णी, बी. ए., जनरल मॅनेजर.

## रोख्यांच्या किंमतींत वाढ

१९५८ सालांत रोख्यांचे भाव साधारणपणें वाढले, असें खालील तुलनात्मक तक्त्यावरून दिसून येईल.

| रोखा | २५–१२–५८ | वर्षापूर्वी |
|---|---|---|
| ३% कन्व्हर्शन लोन | ७७·२० | ७१·०० |
| ३% ५९–६१ | ९९·७९ | ९८·९० |
| ३% ६३–६५ | ९६·८० | ९३·७५ |
| ३½% ६४ | ९९·९० | ९७·७५ |
| ३½% ६७ | ९९·१५ | ९७·५० |
| ४% ७२ | १०१·२० | १००·०० |
| टाटा स्टील | १७३·०० | १६०·५० |
| | x·४· | C·४· |
| इंडि. आयर्न | २५·३० | १८·५६ |
| बॉंबे डाइंग | ५६·४० | ४९·८० |
| सेंचरी | ४१६·५० | ३८२·०० |
| | x·४· | C·४· |
| स्वदेशी | २०४·०० | १६५·५९ |
| बॉंबे बर्मा | ४७६·५० | ५२०·०० |
| | x·४· | C·४· |
| नॅ. रेयॉन | २३३·२५ | २११·२५ |
| | x·४· | C·४· |
| प्री. कन्स्ट्रक्शन | २३०·७५ | १५४·४० |
| सिंदिया | २१·०४ | १७·०८ |
| टेल्को | १५६·०० | १३७.९५ |
| | x·४· | C·४· |

### शेअर्सच्या किंमतींची तुलना

| | | |
|---|---|---|
| सबंध भारत | १३८·२ | १२३ |
| मुंबई | १४०·४ | १२२ |
| कलकत्ता | १३६ | ११९·६ |
| मद्रास | १४९·८ | १४८·८ |

---

## दि जमखंडी अर्बन को. बँक लि.

वरील बँकेचें वसूल भांडवल २,०५,६६० रु. असून रिझर्व्ह फंड ९९,८८९ रुपयांचा आहे. इतर फंडांत १७७,०७३ रु. आहेत. ठेवींची रक्कम १९ लक्ष, ८९ हजार रु. आहे. बँकेनें ७,३५,७५१ रु. सरकारी रोख्यांत गुंतविले असून ९,४४,७५२ रु. कर्जाऊ दिलेले आहेत. अहवालाचे सालीं बँकेस ३१,२८३ रु. नफा झाला. ६¼% डिव्हिडंडला १२,८०० रु. लागले. बँकेचे माजी डायरेक्टर श्री. बी. डी. जत्ती हे म्हैसूर राज्याचे मुख्य मंत्रि झाले आहेत. ( चेअरमन : श्री. म. अथणी, मॅनेजर : एम्. डी. खाडिलकर )

---

## दि विटें मर्चंट्स को. बँक लि

भाग भांडवल १,१२,९८० रु., निधी ( गंगाजळीसह ) १,०८,९८५ रु., ठेवी ८,८५,४५७ रु., कर्जें ६,७१,२९१ रु., इन्व्हेस्टमेंट्स ३,२७,०८६ रु., खेळतें भांडवल ११,१५,९७८ रु., उलाढाल ४५,७१,७६५ रु., नफा १०,८७० रु, डिव्हिडंड ६¼% असें वरील बँकेचें १९५७–५८ बाबत आंकडे आहेत. अहवालाचे वर्षी थकबाकीची वसुली बरी झाल्यामुळें थकबाकीचें प्रमाण उतरलें आहे. ( चेअरमन : रा. ब. दिवटे, मॅनेजर : गो. रा ब्रह्मनाळकर, एलएल. बी. )

## पुरुषार्थ : श्रीगजानन मिल सुवर्णमहोत्सव अंक

पुरुषार्थ मासिकाचा श्रीगजानन मिल सुवर्णमहोत्सव अंक प्रसिद्ध झाला आहे. उद्योगरत्न श्री. वि. रा. वेलणकर ह्यांच्या श्रीगजानन मिलला नुकतींच ५० वर्षें पुरीं होऊन तिनें ५१ व्या वर्षांत पदार्पण केलें आहे. "ऋत्विजानें वैश्वदेवाला आहुती मागून आहुती टाकावी, तशाच ५० वर्षांच्या आहुत्या श्री. वेलणकरांनीं श्रीगजानन मिल्सच्या कार्यकुंडांत टाकल्या आहेत आणि आपलें कीर्तिमंदिर स्वतःच्या हातांनीं उभविलें आहे. ह्या भाग्यशाली संस्थेचा आणि तिच्या चालकांचा स्फूर्तिशाली इतिहास नमूद करण्याची सुसंधि आज पुरुषार्थाला लाभली, हें पुरुषार्थाचें भाग्यच आहे." असें संपादकांनीं म्हटलें आहे. वेलणकर व्यक्तिदर्शन, वेलणकरांचीं विचारमौक्तिकें, संकटांची माळ, सुवर्णतुला, १८ तास अग्निदिव्यांत, थोरांचे संदेश, इत्यादि प्रकरणांतून श्री. वेलणकरांच्या अलौकिक कार्याचें दर्शन आपणांस घडतें. श्री. वेलणकरांची ग्रंथसृष्टीहि सर्वांच्या परिचयाची आहे. स्वानुभवावर आधारलेल्या त्यांच्या तेजस्वी ग्रंथांनीं समाजांत योग्य मनोभाव उद्दीपित करण्याची कामगिरी बजावली आहे. त्यांच्या मिलच्या सुवर्णमहोत्सवाचे निमित्त विशेषअंक काढून पुरुषार्थानें त्यांच्या अलौकिक कामगिरीकडे पुन्हां लक्ष वेधलें आहे.

---

## निर्गतीसाठी एक लक्ष टन साखर

३१ ऑक्टोबर, १९५९ अखेर संपणाऱ्या वर्षासाठी भारत सरकारनें १,००,००० टन साखर निर्गतीसाठी राखून ठेवण्याचें ठरविलें आहे.

---

## "इंडिया १९५८"

नव्या दिल्लीमधील वरील प्रदर्शन ३१ जानेवारीअखेर उघडें ठेवण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहें. आतांपर्यंत २० लक्ष लोक हें प्रदर्शन पाहून गेले.

---

**उसाची किंमत वाढविण्यास नकार**—उत्तर प्रदेश व बिहारमधील साखरेच्या कारखान्यांना पुरविण्यांत येणाऱ्या उसाची किंमत वाढवून देण्यांत यावी अशी मागणी उसाच्या शेतकऱ्यांनीं केली होती. मणामागें १ रु. ७ आण्याचा दर १ रु. १२ आणे करून द्यावा अशी त्यांची मागणी होती. मध्यवर्ती सरकारच्या अन्नमंत्र्यांनीं मागणी नामंजूर केली.

**कच्च्या फिल्मची आयात**—आयात परवाने देण्याच्या चालू सहामाहींत मध्यवर्ती सरकारनें ११·५ कोटी फूट कच्ची फिल्म परदेशांकडून आयात करण्याची व्यवस्था केली आहे. भारतामधील सिनेमाच्या धंद्यासाठी ९ ते ९·५ कोटी फूट फिल्मची गरज लागते. पुरवठ्यापैकी ३९ टक्के फिल्म मद्रासला, ५० टक्के मुंबईला आणि ११ टक्के, कलकत्त्याला देण्यांत येणार आहे. निर्मात्यांना इतका पुरवठा पुरेल, असें सरकारचें म्हणणें आहे.

**ब्रह्मपुत्रा नदीवरील पूल**— आसाम राज्यांत ब्रह्मपुत्रा नदीवर बांधण्यांत यावयाच्या पुलाच्या प्राथमिक कार्याला प्रारंभ करण्यांत आला आहे पुलासाठी १० कोटी रुपये रक्कम खर्च व्हावयाची आहे. पुलासाठी लागणाऱ्या लोखंडी तुळया पुरविण्याबाबत परदेशांतून टेंडर्स मागविण्यांत आलीं आहेत. पुलाच्या पायाभरणीचें काम कलकत्त्याच्या एका कारखान्याकडे सोंपविण्यांत येईल.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.